# रत्नागिरीत उद्यापासून संगीत महोत्सव

## आर्ट सर्कलतर्फे आयोजन : भवाळकर यांच्या धृपद गायनाने प्रारंभ

सकाळ वृत्तसेवा

रत्नागिरी, ता. २४ : आर्ट सर्कल आयोजित अकराव्या कला संगीत महोत्सवास शुक्रवार (ता. २६)पासून प्रारंभ होणार आहे. गायक उदय भवाळकर यांचे धृपद गायन पहिल्या दिवशी रंगणार आहे. ऐतिहासिक थिबा राजवाड्याच्या प्रांगणात महोत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. (कै.) शंकरराव टेंगशे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ होणारा हा कार्यक्रम (कै.) शरद अनंत पटवर्धन कुटुंबीय, नंदकुमार पटवर्धन आणि आसमंत बेनोवलन्स यांच्या विद्यमाने होत असून विनामूल्य आहे.

उद्‌घाटन सायंकाळी ६ वाजता होईल व ६.३० ला रत्नागिरीची कन्या गायिका शमिका भिडे आणि स्वरांगी मराठे यांच्या जुगल गायनाची पर्वणी रत्नागिरीकरांना मिळणार आहे. या दोघीही अश्विनी भिडे-देशपांडे यांच्या शिष्या आहेत.

धृपदसारखा अत्यंत प्राचीन आणि गायला अतिशय कठीण प्रकार जगभरात पोहोचवण्यात भवाळकर अग्रस्थानी आहेत. राग, रस, आणि भाव यांचा परिपोष करत त्यांनी वेगळी शैली विकसित केली आहे. त्यांना सुखविंदर सिंग नामधारी 'जोरी' म्हणजे पंजाबी पखवाजची साथ करणार आहेत. जोरी हे निराळे आणि कठीण वाद्य आहे. शिखांचे पाचवे गुरू अर्जन सिंग यांनी 'जोरी'ची निर्मिती केली. भारतात जोरीवादक हाताच्या बोटांवर मोजण्याइतके आहेत. पाचव्या वर्षांपासून त्यांनी पखवाजसम्राट उस्ताद निहाल सिंग, पंडित किशन महाराज यांच्याकडे त्यांनी शिक्षण घेतले. सारंगी साथ संगीत मिश्रा करणार आहेत. आजोबा नारायण दास मिश्रा आणि भगवान दास मिश्रा यांच्याकडून सारंगी वादनाची दीक्षा घेऊन पुढील शिक्षण वडील पं. संतोष मिश्रा यांच्याकडून घेत आहेत.

### तीन दिवस सांस्कृतिक मेजवानी

२७ जानेवारीला पं. तेजेंद्र मुजुमदार यांचे सरोदवादन आहे. त्यांना तबलासाथ सत्यजित तळवलकर करतील. कथ्थक नर्तक विशाल कृष्ण आणि नृत्यांगना रागिणी महाराज यांच्या नृत्याची रसिकांना पर्वणी लाभणार आहे. २८ जानेवारीला पं. पूर्बायन चॅटर्जी यांचे सतारवादन होणार आहे. डॉ. प्रभा अत्रे यांच्या गायनाने महोत्सवाची सांगता होईल. त्यांना अजय जोगळेकर हार्मोनियम व माधव मोडक तबलासाथ करतील.

### दिवसभर कलाजत्रा!

महोत्सव काळात थिबा राजवाड्यात दिवसभर कलाजत्राही भरणार आहे. या कलाजत्रेत रत्नागिरी आणि परिसरातील कलाकार आपल्या कलागुणांचे वेधक प्रदर्शन करतील. लेन्स आर्टतर्फे पक्षी छायाचित्र प्रदर्शन, चिपळूण येथील वन्यजीव छायाचित्र प्रदर्शन, पटवर्धन हायस्कूलमधील विद्यार्थ्यांची चित्रे यासह ओरिगामी, टॅटू, मातीच्या वस्तू तसेच अन्य कला व चित्रे यांचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. कलाजत्रेला भेट देण्याचे आवाहन केले आहे.